RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ४४] गुरुवार, जून ११, २०२६/ज्येष्ठ २१, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ६७

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांजकडून

घोषणा

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना, करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक/भूसंपादन/खोलसापाडा/पाटबंधारे योजना/कलम-१९/कावि-८४/२०२६.— ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून दिनांक १३/०४/२०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, वसई तालुक्याचे सक्षम प्राधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमाखालील, जिल्हाधिकारी ज्यांची कार्ये पार पाडण्यासाठी वसई तालुक्याकरिता उपविभागीय अधिकारी वसई यांस पदनिर्देशित केले आहे ;

अनुसूची -एक

जमिनीचे वर्णन

(अ) गाव तिल्हेर, ता. वसई, जि. पालघर

भूसंपादन प्रकरण ०१/२०२५

अ.क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	संपादित क्षेत्र (हे.आर.मध्ये)
१.	३१८	०.८०.००
	एकूण	**०.८०.००**

(ब) गाव करंजोण, ता. वसई, जि. पालघर

भूसंपादन प्रकरण ०२/२०२५

अ.क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	संपादित क्षेत्र (हे.आर.मध्ये)
१	११०	०.४७.१०
२	११०	०.१४.०१
३	११०	०.३०.००
४	११०	०.३२.३१
५	११०	०.३७.१०
६	११०	०.२८.००
७	११०	०.१०.९०
८	११०	०.०४.९०
९	११०	०.४९.३०
१०	११०	०.२३.००
११	११०	०.२८.६०
१२	११०	०.०८.२०
१३	११०	०.४८.३१
१४	११०	०.४६.१७
१५	११०	०.२२.१८
१६	११०	०.२२.५०
१७	११५/७	०.८१.००
१८	११५/८	०.८१.००
१९	११५/९	०.८१.००
२०	११५/१०	०.८१.००
२१	११५/११	१.६२.००
२२	११५/१२	१.६२.००
२३	११५/१३	०.८१.००
२४	३५	०.२१.००
एकूण		**१२.०२.५८**

अनुसूची – दोन

सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण	
प्रकल्पाचे नाव	**खोलसापाडा-१ लघु पाटबंधारे योजना प्रकल्प**
प्रकल्पाचे वर्णन	**खोलसापाडा-१ लघु पाटबंधारे योजना प्रकल्प** पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील महाराष्ट्र शासन (जलसंपदा विभाग) यांनी संपूर्ण (१०० टक्के) खर्च करून कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ (बां), कोंकणभवन, नवी मुंबई. यांचेकडून संपादन करण्यात येत आहे. वसई तालुक्यातील मौजे करंजोण येथे खोलसापाडा-१ लघु पाटबंधारे योजना प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. पालघर जिल्ह्यात वसई या तालुक्यात मौजे करंजोण व मौजे तिल्हेर येथे खोलसापाडा-१ लघु पाटबंधारे योजना धरण बांधकाम सिंचन प्रकल्पाकरिता एकूण मौजे करंजोणकरिता १२.०२.५८ हे.आर. व मौजे तिल्हेरकरिता ०.८०.०० हे.आर. जमिनीची आवश्यक्ता असून संपादन संस्थेकडून संपादित क्षेत्र मौजे करंजोणकरिता १२.०२.५८ हे.आर. व मौजे तिल्हेर करिता ०.८०.०० हे.आर. संपादन करणे बाकी आहे.
समाजाला मिळणारे लाभ	पालघर जिल्ह्यामधील वसई तालुक्यातील मौजे करंजोण व मौजे तिल्हेर या गावाकरिता तसेच वसई तालुक्यातील इतर गावांकरिता खोलसापाडा-१ लघु पाटबंधारे योजना धरण बांधकाम सिंचन प्रकल्पामुळे कुटीर उद्योग, लघुउद्योग, मत्स्यव्यवसाय, पर्यटन व इतर लाभ.

अनुसूची – तीन

बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

(१) प्रकल्पाचे बांधकाम

(२) प्रकल्पाचे परिचालक

(३) प्रकल्पाच्या देखभालीखाली

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता

अनुसूची – चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनी त्यांचे अधिसूचना क्र. संकीर्ण -०१/२०१५/ प्र.क्र.३/अ-२, दिनांक १३.०३.२०१५ अन्वये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (सुधारणा) अध्यादेश, २०१४ (२०१४ चा अध्या.९) याद्वारे भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) या मध्ये कलम १० क समाविष्ट केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसुचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण क्र. २०९ दिनांक ०६.१०.२०२३ नुसार जनहिताच्या दृष्टीने लोकहितकारी प्रकल्प असल्याकारणे प्रकरण दोन आणि प्रकरण तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

अनुसूची – पाच

अ	**प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम**	सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वसई
ब	**प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता**	श्रीप्रस्थ, नालासोपारा-विरार लिंक रोड, निळेमोरे, नालासोपारा (प.), ता. वसई, जि. पालघर, पिन. नं. ४०१ २०३.
क	**ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील**	भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत जमिनीचे संपादन करणेबाबत आवश्यक ती कार्यवाहीकामी मा. जिल्हाधिकारी पालघर, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) समन्वय, पालघर यांचेकडील जा.क्र. भूसंपादन/ कक्ष-१/टे-१/कावि-८४९/२०२५ व समक्रमांकाचे पत्र क्र. भूसंपादन कक्ष-१/टे-१/कावि-८०२/२०२५ दि. २८/०५/२०२५ रोजी अन्वये उपविभागीय अधिकारी वसई यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करणेत आली आहे.

शेखर घाडगे,
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, वसई.

डॉ. इंदु राणी जाखड़,
जिल्हाधिकारी, पालघर.

पालघर,

दिनांक १० जून २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.